पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **१०**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२६/१२/२०१९** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २६/१२/२०१९ रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.गोफणे अनुराधा देविदास
४. मा.मुंढे उषा अंकुश
५. मा.सुजाता सुनिल पालांडे
६. मा.साधना अंकुश मळेकर
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – सहा.आयुक्त(नावियो) , मा.जागडे – प्र.नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पाटील – प्राचार्य आयटीआय, मा.डॉ.डांगे – महिला वैद्यकीय अधिकारी, मा.बहाद्दरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १) मे.पुणे सिटी कनेक्ट डेव्हलपमेंट फौंडेशन यांच्या सहकार्याने शहरात विविध ठिकाणी “ LIGHT HOUSE ” रोजगार निर्मिती प्रकल्प सुरु करणेबाबत...

विषय क्रमांक २) महिला बचत गटांच्या अनुदानात वाढ करणेबाबत – मा.साधना मळेकर, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३) ठराव क्रमांक १२, दि.२६/०८/२०१९ मध्ये दुरुस्ती करणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४) महिलांना चारचाकी वाहन प्रशिक्षण देणेकामी नव्याने ड्रायव्हींग स्कूलची नियुक्ती करणेबाबत – मा.साधना मळेकर, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

दिनांक **१२/१२/२०१९** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ०१

दिनांक – २६/१२/२०१९

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/४२३/२०१९, दि.२४/१२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभाग आणि मे.पुणे सिटी कनेक्ट डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्यीमध्ये जागांच्या उपलब्धतेनुसार मनपा हद्दीतील १८ ते ३० वयोगटातील युवक, युवतींसाठी “ LIGHT HOUSE ” रोजगार निर्मितीचा प्रकल्प राबविण्यास तसेच या प्रकल्पाकरीता मुलभूत सोयी सुविधा उदा.जागा, संगणक संच इत्यादी विनामुल्य महापालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यास तसेच मे.पुणे सिटी कनेक्ट डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांनी या प्रकल्पांतर्गत सहभागी होणा-या लाभार्थींना उदा. १८ ते ३० वयोगटातील महिला, मुले, मुली यांना मोफत प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करुन देण्यास व त्याकरीता आवश्यक मनुष्यबळ व अनुषंगिक खर्च त्यांनी CSR (Corporate Social Responsibility ) च्या माध्यमातून उभारुन प्रकल्प कार्यान्वीत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सुरुवातीला झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील १० मी.X १८ मी. जागा, संगणक व अनुषंगिक बाबी इ. आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा मनपामार्फत मोफत उपलब्ध करुन देउन एक “ LIGHT HOUSE ” प्रकल्प प्रायोगित तत्वावर सुरु करण्यास व त्यानंतर दुस-या टप्यात मनपा शाळा इमारत (जुने ड क्षेत्रीय कार्यालय), पिंपरीगाव या ठिकाणी तसेच तद्रंतर क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध इमारतींमधील जागा विचारात घेऊन टप्या टप्याने मा.आयुक्त यांच्या मान्यतेने “ LIGHT HOUSE ” प्रकल्प मंजूर धोरणानुसार संयुक्तरित्या राबविण्यास व प्रत्येक प्रकल्प किमान ५ वर्षे कालावधीकरीता सुरु करणेकामी धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच सदर कालावधीत मोफत जागा उपलब्ध करुन मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २६/१२/२०१९

सुचक : मा.साधना मळेकर अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

मा.साधना मळेकर, मा.भिमाबाई फुगे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला बचत गटांना अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत सध्या दिड वर्षे पुर्ण झालेल्या बचत गटांना देण्यात येणा-या र.रु.२०,०००/- ऐवजी र.रु.२५,०००/- देणेस तसेच १० वर्षे पुर्ण झालेल्या महिला बचत गटांना र.रु.३५,०००/- अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २६/१२/२०१९

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.साधना मळेकर

मा.सुजाता पालांडे, मा.साधना मळेकर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विविध प्रकारची बौध्दिक खेळणी देणे (कपाटासहीत) तसेच याबाबतची संपुर्ण प्रशासकीय कार्यवाही व खेळणी वाटप प्राथमिक शिक्षण विभागामार्फत करणेस तसेच खरेदीकामीची संपूर्ण प्रक्रीया मध्यवर्ती भांडार विभाग व साहित्यांची तांत्रिक तपासणी आय.टी.आय विभागामार्फत करणेत येवून याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत असणा-या मदर तेरेसा-शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगीण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक - ०४

दिनांक – २६/१२/२०१९

सुचक : मा.साधना मळेकर अनुमोदक : मा.सुजाता पालांडे


मा.साधना मळेकर, मा.सुजाता पालांडे यांनी प्रस्तावित केलेनुसार नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांना चार चाकी वाहन प्रशिक्षण योजना राबविण्यात येते. या योजने अंतर्गत ज्या महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत परंतु त्यांना प्रशिक्षण मिळालेले नाही अशा महिलांना चारचाकी वाहन प्रशिक्षण देणेकामी नव्याने ड्रायव्हींग स्कूलची नियुक्ती करुन आहे त्याच दराने ड्रायव्हींग प्रशिक्षण देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५८४/२०१९
दिनांक : २७/१२/२०१९



**प्र.नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.